


# पारनेर दर्शन




वर्ष ३ , अंक ७२, शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ द्या !

## खासदार नीलेश लंके यांची मागणी

## मुदतवाढ न दिल्यास संसदेबाहेर आंदोलन

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

सोयाबीन खरेदीसाठी किमान एक महिन्यांची मुदतवाढ मिळावी ही आमची मागणी असून त्यासंदर्भात आपण संबंधित मंत्र्यांची भेट घेउन निवेदन सादर करणार आहोत. मागणीची दखल न घेतली गेल्यास सोमवारी संसदेबाहेर या प्रश्नावर आंदोलन करू असा इशारा खा. नीलेश लंके यांनी दिल्लीमध्ये पत्रकारांशी बोलताना दिला.

संसदेच्या अधिवेशनामध्ये नवी दिल्लीमध्ये असलेल्या खा. नीलेश लंके यांनी विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी गुरूवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर पवार यांच्या निवसासस्थानाबाहेर खा. लंके यांनी पत्रकारांशी संवाद साधला. खा. लंके म्हणाले, सोयाबीन खरेदीसाठी

उर्वरित पान ३ वर

### शेतकरी सुखी तर देश सुखी !

*सोयाबीन खरेदी झाली नाही तर शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे. व्यापाऱ्यांना कवडीमोल भावाने सोयाबीन विकावे लागणार आहे. त्यामुळेच मी मंत्र्यांना पत्र देउन या प्रश्नाकडे लक्ष वेधणार आहे. शेतकरी हा महत्वाचा आहे. तो अन्नदाता आहे. शेतकरी सुखी राहीला तर देश सुखी राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पाठीशी, शेतकऱ्यांबरोबर राहीले पाहिजे अशी आमची भूमिका आहे. संसदेत आल्यानंतर मी पहिला प्रश्न दुध, कांदा, सोयाबीनचा मांडला होता. यावेळच्या अधिवेशनातही शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर मागण्या केल्या असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.*



नवी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना खा. नीलेश लंके यांनी विविध प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट केली.

### नगर-सुपा मार्गे रेल्वेमार्गासाठी आग्रही

*रेल्वेच्या मागणीसंदर्भात मागील अधिवेशनादरम्यान आपण रेल्वे मंत्र्यांना निवेदन सादर केले आहे. त्यापूर्वीही या मागणीसाठी पत्रव्यवहार केला होता. संभाजीनगर, वाळुंज, देवगड, शिड, शनी शिंगणापुर, अहिल्यानगर, सुपा-पारनेर एमआयडीसी, रांजणगाव एमआयडीसी व पुणे या मार्गावर रेल्वे सेवा हवी अशी आमची मागणी असून त्यासाठी आम्ही आग्रही आहोत.*

***खासदार नीलेश लंके,*** *लोकसभा सदस्य*

### संसदेसमोर आंदोलन

*शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गेल्या अधिवेशनात तुम्ही आक्रमक दिसत होता. या प्रश्नावर काय भूमिका घेणार या प्रश्नावर बोलताना सोयाबीन खरेदीस मुदतवाढ मिळाली नाही तर संसदेच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन करणार असल्याचे खा. लंके यांनी जाहिर केले.*

### त्यांना दूर ठेवण्यात कोणाला स्वारस्य ?

*व्ही.राधा हे अतिशय चांगले अधिकारी आहेत. त्यांनी केंद्र सरकारमध्ये अनेक मंत्र्यांसोबत काम केलेले आहे. त्यांना दूर ठेवण्यात कोणाला स्वारस्य आहे, कशासाठी आहे हे सर्वांना माहीती असल्याचे खा. लंके यांनी पत्रकारांच्या प्रश्नावर बोलताना सांगितले.*

### मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येईल

*जायकवाडी प्रकल्पाअंतर्गत पैठण, शेवगांव या भागातील मच्छिमार बांधवांचा प्रश्न आहे. दरवष या मच्छिमार बांधवांवर टांगती तलवार असते. इको सेंसेटिव्ह झोन असतानाही तिथे सौर प्रकल्प उभारण्याचा घाट घालण्यात आला आहे. हा प्रकल्प झाल्यास लाखो लोकांवर उपासमारीची वेळ येणार आहे. त्यासंदर्भातही संबंधित मंत्र्यांना मी भेटणार असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.*

### शिक्षकांच्या प्रश्नासाठी अर्थमंत्र्यांना भेटणार

*सेवा निवृत्त शिक्षकांचे काही प्रश्न आहेत. या प्रश्नांसदर्भात विशेषतः अर्थमंत्री यांच्याशी मी पत्रव्यवहार केला आहे. या प्रश्नासंदर्भात निर्मला सितारमण यांच्यासमवेत बैठक घेण्यासंदर्भात आपण शरद पवार यांची भेट घेतल्याचे पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना खा. लंके यांनी सांगितले.*

# कड्याच्या फौजदाराने बांधली वडझिरे तर्फेची वेस !


## ३५६ वर्षांपूर्वीच्या शिलालेखाने इतिहासाच्या स्मृती समोर

**वडझिरे : विशेष प्रतिनिधी**

इसवी सन १६३६ मध्ये मुघलांच्या अंमलाखाली असलेल्या कर्डे परगण्याचा फौजदार शेख अब्दुल रहीमान याने या परगण्यातील एक तर्फ असलेल्या वडझिरे व सध्याच्या वडझिरे गावाची वेस बांधल्याचा इतिहास वेशीवरील शिलालेखामुळे उजेडात आला आहे.

नगर जिल्ह्यात पारनेर तालुक्यात वडझिरे हे छोटेसे गाव आहे. जहागिरीचे गाव अशी या गावाची जुनी ओळख आहे. औरंगजेबाने इसवी सन १६३६ मध्ये अहमदनगरवर मुघलांची कायम स्वरूपी सत्ता स्थापन केली. त्यामुळे निजामशाहीचा बराच भाग मुघलांच्या अमलाखाली आला. त्यापैकी करडे हा एक परगणा होता. या परगण्यात वडझरे व सध्याचे वडझिरे हे एक तर्फ होते. मुघल काळात परगणा हा आताच्या तालुक्यासारखा प्रशासकीय विभाग होता.

उर्वरित पान ३ वर




वडझिरे येथे ३५६ वर्षांपूर्वीचा शिलालेख आढळून आला आहे.

### शिलालेखाचे वाचन करण्यात आले ते असे

- *शके १५९११५९१ सौम्य संवछ*
- *रे जागीर सीराजदीन मुहम*
- *द अमल शेख अबदुळ रही*
- *मान फौजदार ता. वडझरे प्रा*
- *कर्डे सन १०७९ दरवाजा केला.*

### शिलालेखाचा अर्थ

*वेशीच्या बांधकामाची स्मृती जपणे हा या शिलालेखाचा उद्देश होता. शालिवहन शतकाच्या १५९१ व्या वर्षी सौम्य संवत्सरात फौजदार शेख अब्दुल रहीमान यांचया अमला खालील जहागीरदार सीराजुददीन मुहंमद याने सन १०७९ मध्ये कर्डे प्रगण्यातील तर्फ वडझिरे येथे दरवाजा बांधला.*

# स्व. वसंतराव झावरे स्मृतीगंध पुरस्कार जाहीर

## सुजित झावरे पाटील यांची घोषणा; शनिवारी ९ वा स्मृतीदिन

**वासुंदे : प्रतिनिधी**

माजी आमदार स्व. वसंतराव झावरे पाटील यांच्या ९ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना स्व वसंतराव झावरे पाटील स्मृतीगंध पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार असून जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी गुरूवारी या पुरस्कारांची घोषणा केली.



शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वासुंदे येथे स्व. झावरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्मृतीदिनानिमित्त सकाळी १० वाजता

उर्वरित पान ३ वर

### पुरस्कारार्थी

- *देवकृपा फाउंडेशनच्या वतीने मा. आ. स्व. वसंतराव झावरे स्मृतीगंध पुरस्कार विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रदान करण्यात येणार आहेत. ते पुढीलप्रमाणे :*
- *अध्यात्मिक क्षेत्र – वैराग्यमुर्ती ह. भ.प.डॉ. नारायण महाराज जाधव*
- *कृषि क्षेत्र – सुभाष गोरक्षनाथ पठारे जवळे*
- *औद्योगिक क्षेत्र – स्व. शांताराम मामा लंके कन्हैय्या उद्योग समुह (मरणोत्तर)*
- *सामाजिक क्षेत्र – शरद भाऊसाहेब पवळे नारायणगव्हाण : शेत पानंद रस्ते चळवळ*
- *कला क्षेत्र – संतोष पांडूरंग क्षिरसागर वासुंदे*
- *साहित्य – देवा गोपिनाथ झिंजाड गारखिंडी*

# 'लाडक्या बहिणी'च्या प्रसिद्धीसाठी ३ कोटी !

## माहिती व जनसंपर्क विभागाच्या माध्यम योजनेला मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवून देणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा आता आणखी व्यापक प्रचार आणि प्रसिद्धी करण्याचे महायुती सरकारने ठरवले आहे. त्यानुसार योजनेची सोशल आणि डिजिटल माध्यमातून प्रसिद्धी करण्यासाठी तीन कोटी रुपये खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भात माहिती व जनसंपर्क विभागाने तयार केलेल्या माध्यम योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्याने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आपल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात महिलांना महिना दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' घोषित केली. यासाठी वार्षिक अडीच लाख रुपये उत्पन्न मर्यादा निश्चित करून पात्र महिलांचे ऑनलाइन अर्ज मागवण्यात आले. त्यानंतर जुलै २०२४ पासून पात्र महिलांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्यास सुरुवात झाली.




विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सरकारने नोव्हेंबर २०२४पर्यंत एकूण पाच हप्ते 'लाडक्या बहिणीं'च्या बँक खात्यात जमा केले होते. विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून सरकारने 'लाडकी बहीण' योजनेच्या प्रसिद्धीसाठी २०० कोटी रुपयांच्या माध्यम आराखड्यास मान्यता

उर्वरित पान ३ वर


# धनंजय मुंडे कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात दोषी

## करुणा शर्मा यांना पहिली पत्नी म्हणून कोर्टाची मान्यता दरमहा सव्वालाख रु. पोटगीचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

धनंजय मुंडे यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. त्यांच्या विरोधात करुणा शर्मा-मुंडे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप मान्य केले आहेत. त्यामुळे करुणा शर्मा-मुंडे यांना पोटगी देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. करुणा शर्मा-मुंडे याच धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी असल्याचे या माध्यमातून कोर्टाने मान्य केले आहे. त्यामुळे आता धनंजय मुंडे यांच्यावरील दबाव आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

यासंदर्भात कोर्टाने दिलेल्या निकालानुसार करुणा यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केलेले सर्व आरोप कोर्टाने मान्य केले आहेत. करुणा



मुंडे या कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी ठरल्या असल्याचे कोर्टाने मान्य केले आहे. त्यामुळे आता धनंजय मुंडे यांनी करुणा यांना दरमहा एक लाख २५ हजार तर त्यांची मुलगी शिवानी हिला दरमहा ७५ हजार रुपये देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. इतकेच नाही तर खटला लढण्यासाठी करुणा यांना २५ हजार रुपये खर्च देण्याचे आदेश देखील


उर्वरित पान ३ वर








| Sr.No. | Post | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|---|
| 01 | Principal | Physics / Chemistry Biology / Math's | M.Sc./ B.Ed. | 01 |
| 02 | Asst. Professor | Physics | M.Sc. / B.Ed. | 01 |
| 03 | Asst. Professor | Math's | M.sc/ B.Ed. | 01 |
| 04 | Asst. Professor | Chemistry | M.Sc. B.Ed. | 01 |
| 05 | Asst. Professor | Biology | M.Sc. B.Ed. | 01 |
| 06 | Asst. Professor | IT / Computer Teacher | B.E. comp/ M.CS/ MCA | 01 |
| 07 | Asst. Professor | Marathi | M.A.,/ B.Ed | 01 |
| 08 | Asst. Professor | English | M.A.,/ B.Ed | 01 |
| 09 | Asst. Professor | Geog./ Economics | M.A.,/ B.Ed | 01 |
| 10 | Asst. Professor | Accountancy | M.Com /B.Ed. | 01 |
| 11 | Asst. Professor | OC | M.Com /B.Ed. | 01 |
| 12 | Asst. Professor | SP | M.Com /B.Ed. | 01 |



# चंदेरी



## रश्मिका मंदानाच्या वेदना तीव्र

बॉलिवूड अभिनेत्री रश्मिका मंदाना मुंबईत तिच्या आगामी छावा चित्रपटाच्या ट्रेलर लाँचला उपस्थित होती. पण पायाच्या दुखापतीमुळे ती लंगडत होती. तिने अलीकडेच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आणि तिच्या पायात तीन फ्रॅक्चर आणि स्नायूंमध्ये ताण आल्याचे सांगितले होते. रश्मिकाने तिचा मेडिकल रिपोर्ट आणि एक्स-रेचा फोटोही शेअर केला आहे. ट्रेलर लाँचवेळी रश्मिका मंदाना लंगडत चालत असताना विकी कौशलने मदत केली. रश्मिकाने सांगितले, की मी २ आठवड्यांपासून माझा पाय खाली ठेवला नाही. मला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची खूप आठवण येतेय... १२ जानेवारी रोजी जिममध्ये वर्कआउट करताना रश्मिकाच्या पायाला दुखापत झाली होती. तरीही ती तिचे काम करत आहे. पुष्पा २ : द रुल चित्रपटानंतर ती छावामध्ये दिसणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित या चित्रपटात विकी कौशल मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट १४ फेब्रुवारी रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. विकी छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. महाराणी येसूबाईच्या भूमिकेत रश्मिका दिसणार आहे.

## करण वीर मेहराच्या दुसऱ्या बायकोने केलं बॉयफ्रेंडसोबत लग्न

**'बिग बॉस १८' चा विजेता करण वीर मेहराच्या वैयक्तिक आयुष्याची खूप चर्चा होत असते. त्याचे दोन लग्न झाले. दोन्ही वेळा घटस्फोट झाला. आता त्याच्या दुसऱ्या बायकोने प्रियकरासोबत दुसरं लग्न केलं आहे. निधी सेठने तिच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.**



घटस्फोट घेतल्यानंतर निधी पुन्हा प्रेमात पडली होती. तिने अगदी साधेपणाने बंगळुरू येथील मंदिरात लग्न केले. निधीच्या पतीचे नाव संदीप कुमार आहे. तिचा लग्नाचा लूक खूपच साधा होता. गुलाबी रंगाची बनारसी साडी व सोन्याच्या दागिन्यांत ती दिसली. तिच्या नव्या पतीने निळ्या रंगाचा फ्लोरल कुर्ता पायजमा घातला होता. निधीने दुसऱ्या लग्नाबद्दल सांगितले, की प्रेम हा संघर्ष नसून एक सुंदर प्रवास आहे, हे संदीपने मला सांगितलं. 'मी' पेक्षा तो 'आम्ही'ला जास्त महत्त्व देतो. आमचं नातं दिवसेंदिवस जास्त मजबूत होईल, असा मला विश्वास आहे. दोन वर्षांपासून त्याने माझ्या प्रत्येक आनंदात आणि आव्हानात साथ दिली. त्याचा पाठिंबा, दयाळूपणा आणि आमच्यातील सुंदर नात्याबद्दल मी कृतज्ञ आहे. माझा आधार बनल्याबद्दल, मला होय बोलल्याबद्दल आणि माझे जीवन प्रेमाने भरल्याबद्दल धन्यवाद. आय लव्ह यू एस.के. असे तिने म्हटले आहे.

पहिला पती करण वीर मेहरा आणि निधी सेठ यांची पहिली भेट २००८ मध्ये एका जाहिरातीच्या शूटिंगदरम्यान झाली होती. एकत्र काम करताना प्रेमात पडले आणि नंतर दोघांनी लग्न केले. करण वीर मेहराचे हे दुसरे लग्न होते. त्याने २००९ मध्ये त्याची बालपणीची मैत्रीण देविकाशी लग्न केले होते, पण काही वर्षांनी त्यांचा घटस्फोट झाला होता. नंतर त्याने निधीशी लग्न केलं होते. पण हेही नातं टिकलं नाही. आता निधीने संदीपशी दुसरं लग्न केलं.

## शशांकच्या घरी आली लक्ष्मी!

**शशांक केतकरने यंदा नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्याच्या तमाम चाहत्यांना तो लवकरच दुसऱ्यांदा बाबा होणार असल्याची आनंदाची बातमी दिली होती. शशांक व त्याची पत्नी प्रियांका ढवळे यांनी सुंदर असं मॅटर्निटी फोटोशूट करत लवकरच आई-बाबा होणार असल्याचं सर्वांना सांगितलं होतं. यानंतर संपूर्ण कलाविश्वातून अभिनेत्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला होता. शशांक मुलगा होणार की मुलगी याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर आता अभिनेत्याने घरी 'लक्ष्मी'चं आगमन झाल्याची गोड बातमी इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे.**

शशांक केतकरला मुलगी झाली आहे. आता खऱ्या अर्थाने कुटुंब पूर्ण झालं. घरात लक्ष्मी आली असं म्हणतं अभिनेत्याने त्याच्या चिमुकल्या लेकीचं नाव देखील जाहीर केलं आहे. शशांकने ४ डिसेंबर २०१७ मध्ये त्याची मैत्रीण प्रियांका ढवळेबरोबर लग्न केलं. शशांक व प्रियांका यांनी २०२१ मध्ये त्यांच्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं होतं. अभिनेत्याच्या मोठ्या मुलाचं नाव ऋग्वेद असं आहे. आता 'हम दो हमारे दो' असं म्हणत शशांकने त्याच्या लेकीचं नाव 'राधा' ठेवलं असल्याचं जाहीर केलं आहे. शशांकने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर कौटुंबिक फोटो शेअर केला आहे. यावर प्रियांका, शशांक, ऋग्वेद, राधा अशी चौघांची नावं लिहिल्याचं पाहायला मिळत आहे. शशांकने मुलगी झाल्याची गोड बातमी देताच नेटकऱ्यांनी या पोस्टवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. मराठी कलाकारांसह अभिनेत्याच्या चाहत्यांनी प्रियांका आणि शशांक यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शशांकच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर चित्रपट, नाटक, मालिका, वेबसीरिज अशा चारही माध्यमांमध्ये त्याने अभिनयाचा ठसा उमटवला आहे. सध्या तो 'स्टार प्रवाह' वाहिनीच्या 'मुरांबा' या मालिकेत मध्यवर्ती भूमिका साकारत आहे. या मालिकेला प्रेक्षकांची सुद्धा चांगली पसंती मिळत आहे. शशांकसह या मालिकेत अभिनेत्री शिवानी मुंढेकर प्रमुख भूमिकेत झळकली आहे.



## अभिनेता अभिषेक रहाळकरने गुपचूप उरकला साखरपुडा


**मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहेत. नुकतेच शिवानी सोनार आणि अंबर गणपुळे हे दोघंही लग्नबंधनात अडकले आहेत. आता येत्या काही दिवसांत दिव्या पुगावकर, अंकिता वालावलकर अशा अनेक सेलिब्रिटींच्या घरी लग्नसराई सुरू होणार आहे. अशातच आता मराठी मालिकाविश्वात काम करणाऱ्या आणखी एका अभिनेत्यासंदर्भात चाहत्यांना आनंदाची बातमी मिळाली आहे.**

'मन धागा धागा जोडते नवा' या मालिकेमुळे घराघरांत पोहोचलेला लोकप्रिय अभिनेता म्हणजेच अभिषेक रहाळकर. येत्या काही दिवसात अभिषेक लग्नबंधनात अडकणार असून नुकताच त्याचा साखरपुडा पार पडला आहे. अभिषेकच्या साखरपुड्यातील इनसाइड फोटो 'दुर्गा' मालिकेत प्रमुख भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री रुमानी खरेने शेअर केला आहे. 'Cutiess' असं कॅप्शन देत रुमानीने या फोटोमध्ये अभिषेक आणि त्याच्या होणाऱ्या पत्नीला टॅग केलं आहे. अभिषेकच्या होणाऱ्या पत्नीचं नाव कृतिका असं आहे. रुमानीशिवाय अभिनेत्री अक्षता आपटे आणि स्वानंद केतकर यांनीही या जोडप्याला शुभेच्छा देण्यासाठी पोस्ट शेअर केल्या आहेत. साखरपुड्यातील फोटोमध्ये अभिषेक रहाळकर गुडघ्यावर बसून होणाऱ्या पत्नीच्या हातात अंगठी घालत असल्याचं पाहायला मिळत आहे. साखरपुड्यात अभिषेकने शेरवानी घातली होती. तर, त्याच्या होणाऱ्या पत्नीने गडद निळ्या रंगाचा सुंदर असा ड्रेस घातल्याचं फोटोमध्ये पाहायला मिळत आहे.

## रणबीर कपूर अन् दीपिका पादुकोण एकत्र करणार काम ?

**संजय लीला भन्साळी यांच्या आगामी सिनेमात रणबीर कपूरसह आलिया भट्ट आणि विकी कौशल मुख्य भूमिकेत असून दीपिका पादुकोण यात कमिओ करणार असल्याची चर्चा आहे.**

२०२४ मध्ये संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाची घोषणा झाली. या चित्रपटातून संजय लीला भन्साळी आलिया भट्टबरोबर पुन्हा काम एकदा काम करणार असून आलिया आणि रणबीर कपूर यांना एका मोठ्या प्रोजेक्टमध्ये पुन्हा एकत्र पाहण्याची संधी मिळणार आहे. 'ब्रह्मास्त्र' फ्रँचायजीनंतर हा दुसरा चित्रपट असेल ज्यात हे दोघे एकत्र दिसणार आहेत. इतकेच नाही तर चाहत्यांसाठी अजून एक विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे, 'छावा'च्या रिलीजसाठी सज्ज असलेला विकी कौशल 'लव्ह अँड वॉर'मध्ये प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. हा चित्रपट आता २०२६ मध्ये रिलीज होणार आहे. आता हा सिनेमा आधीच मोठा आणि भव्य असताना, भन्साळी यांच्या तीन ब्लॉकबस्टर चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका साकारणारी दीपिका पदुकोण 'लव्ह अँड वॉर'मध्ये एक खास कॅमिओ करणार आहे. या चित्रपटाच्या शूटिंगला लवकरच सुरुवात होणार आहे. जर दीपिका पदुकोण 'लव्ह अँड वॉर'मध्ये दिसणार असल्याच्या चर्चा खऱ्या ठरल्या, तर याचा अर्थ ७ वर्षांनंतर ती पुन्हा भन्साळींबरोबर काम करेल. त्यांनी शेवटचे २०१८ मध्ये 'पद्मावत'साठी एकत्र काम केले होते. इतकेच नाही तर ३ वर्षांनंतर दीपिका आणि रणबीर कपूर पुन्हा एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत. २०२२ मध्ये आलेल्या 'ब्रह्मास्त्र : पार्ट वन – शिवा'मध्ये दीपिकाचा कॅमिओ होता, पण यापूर्वी रणबीरबरोबर ती शेवटची २०१५ च्या 'तमाशा'मध्ये दिसली होती.



## दाक्षिणात्य अभिनेत्रीने घेतला घटस्फोट

**एकीकडे सिनेविश्वात अनेक कलाकार लग्नबंधनात अडकत असताना प्रसिद्ध अभिनेत्रीचा संसार मोडला आहे. तिने स्वतः तिच्या घटस्फोटाबद्दल सोशल मीडियावर चाहत्यांना माहिती दिली. आसिफ अली आणि इंद्रजित सुकुमारन यांच्या 'कोहिनूर' या मल्याळम चित्रपटात आणि थलपथी विजयच्या 'भैरवा'मध्ये झळकलेली लोकप्रिय अभिनेत्री अपर्णा विनोद हिने पती रिनिलराज पीकेपासून वेगळे होण्याचा निर्णय जाहीर केला आहे. तिने लग्न व पतीबरोबरचे सर्व फोटो डिलीट केले आहेत.**




अपर्णाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीजवर शेअर केलेल्या निवेदनात लग्न हा आयुष्यातील कठीण टप्पा होता, असं म्हटलंय. प्रिय मित्रांनो आणि माझ्या चाहत्यांनो, मला तुम्हाला सांगायचंय की अलीकडेच माझ्या आयुष्यात एक मोठा व महत्त्वपूर्ण बदल झाला आहे. खूप विचार केल्यानंतर मी माझे लग्न मोडण्याचा निर्णय घेतला. लग्न मोडणं हे अजिबात सोपं नव्हतं, पण मला वाटतंय की माझ्यासाठी हा निर्णय योग्य आहे, असं अपर्णा म्हणाली. २८ वर्षीय अपर्णा पुढे म्हणाली, की माझे लग्न हा माझ्या आयुष्यातील भावनिक आणि कठीण टप्पा होता. त्यामुळे मी आयुष्यात पुढे जाण्यासाठी ते चॅप्टर बंद केले आहे. या कठीण काळात मला मिळालेल्या प्रेम आणि समर्थनाबद्दल मी कृतज्ञ आहे. आशा आणि सकारात्मकतेने आयुष्यात पुढे जाण्यासाठी मी उत्सुक आहे, असे तिने म्हटले आहे.

- अपर्णा विनोदचे करिअर : अपर्णाने विनोदने दिग्दर्शक प्रियानंदन यांच्या २०१५ मध्ये आलेल्या न्यान निन्नोडू कूदेयुंडू या चित्रपटातून पदार्पण केले होते. तिने 'कोहिनूर' आणि 'भैरवा' सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं. भैरवामध्ये कीर्ती सुरेश आणि थलपती विजयदेखील होते. ती शेवटची दिग्दर्शक शरण कुमारच्या ॲक्शन थ्रिलर 'नादुवन'मध्ये दिसली होती. यात तिच्याबरोबर अभिनेता भरत आणि गोकुल आनंद यांच्यादेखील भूमिका होत्या.

### व्हॅलेंटाईन डेला केलं होतं लग्न

अपर्णा आणि रिनील राज यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये साखरपुडा केला होता. त्यानंतर काही महिन्यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये लग्न केलं होतं. त्यांनी खासगी सोहळ्यात लग्न केलं होतं. त्यांच्या लग्नात दोघांचे कुटुंबीय व जवळचे मित्र उपस्थित होते. १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी त्यांनी लग्नगाठ बांधली होती.

## संघर्षमय आयुष्य जगलेला शाहिद



**बॉलीवूडमध्ये अनेक नवनवे चेहरे नशीब आजमावत असतात. त्यातील काही जण खूप संघर्ष करून सिनेमे मिळवतात, तर काही कलाकारांचे आई- वडील सिनेसृष्टीशी संबंधित असल्याने त्यांना या क्षेत्रात लगेच संधी मिळते. मात्र बॉलीवूडमध्ये असा एक अभिनेता आहे, त्याचे वडील सिनेसृष्टीतील मोठे अभिनेते होते. तरीही त्याला २५० ऑडिशन दिल्यानंतर पहिला सिनेमा मिळाला होता. त्याने त्याआधी बॅकग्राउंड डान्सर, तर कधी विविध जाहिरातींतून लहान भूमिका करत बॉलीवूडमध्ये प्रवेश केला.**

या अभिनेत्याचे नाव आहे शाहिद कपूर. त्याचे वडील, पंकज कपूर, १९८० पासून चित्रपटसृष्टीतील एक नामांकित अभिनेते आहेत. मात्र, शाहिदने लहानपणी संघर्षमय आयुष्य जगले. त्याच्या आई- वडिलांचा घटस्फोट झाला तेव्हा तो फक्त तीन वर्षांचा होता. त्यानंतर त्याने आपली आई, नीलिमा अजीम, ज्या एक कथक नर्तक होत्या, यांच्याबरोबर जीवन व्यतीत केले. शाहिदने सांगितले की, चित्रपटसृष्टीत आपली जागा मिळवण्यासाठी त्याला खूप संघर्ष करावा लागला. तो म्हणाला, की माझे वडील एक चरित्र अभिनेता आहेत आणि माझी आई १५ व्या वर्षापासून कथक नर्तकी होती. मी भाड्याच्या घरात राहिलो आहे. अनेक ऑडिशन दिल्या आहेत, त्यामुळे मला कधीच विशेष सुखसोयी असलेल्या परिस्थितीची जाणीव झाली नाही. माझ्या संपूर्ण आयुष्यात मला माझ्या परिस्थितीमुळे नेहमीच हतबल वाटायचं, असे तो म्हणाला. शाहिदने आपल्या आयुष्यातील त्या काळाची आठवण सांगितली जेव्हा त्याच्याकडे लोखंडवाला मार्केटमधून कपडे खरेदी करण्यासाठीही पैसे नव्हते. आज लोक म्हणतात की शाहिदचा फॅशन सेन्स खूप चांगला आहे, पण मला यावर हसू येते. कारण मला आठवतं की एकेकाळी माझ्याकडे लोखंडवाला मार्केटमधून कपडे विकत घेण्यासाठीही पुरेसे पैसे नव्हते, असे त्याने सांगितले. अनेकदा सभोवतालचे लोक म्हणायचे की तो खूप मेहनत घेतो. पण त्याचे चित्रपट तितकेसे चालत नाहीत. या नकारात्मक ऊर्जेचा परिणाम शाहिदवर होत होता. पण लॉकडाऊनच्या काळात त्याने स्वतःत बदल घडवून आणला. शाहिदने सांगितले की, 'कबीर सिंग' सिनेमाच्या अगोदर अशा परिस्थितीला सामोरे जावे लागले, की कलाकार, स्टार किंवा व्यक्ती म्हणून कमी लेखले गेले. माझ्या २१ वर्षांच्या प्रवासाने मला शिकवले आहे की मी एक सर्व्हायव्हर आहे आणि अशा कठीण परिस्थितीतून मार्ग काढू शकतो. 'कबीर सिंग'च्या काही काळ आधी शाहिद संजय लीला भन्साळी यांच्या 'पद्मावत' चित्रपटात दिसला होता, ज्यात दीपिका पदुकोन आणि रणवीर सिंग प्रमुख भूमिकेत होते.

## लग्नानंतर पाचच महिन्यांत दिली गुड न्यूज

प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेता किरण अब्बावरम आणि अभिनेत्री रहस्या गोरक हे लवकरच आई-बाबा होणार आहेत. लग्नानंतर पाचच महिन्यांत या दोघांनी आई-बाबा होणार असल्याचं सोशल मीडियावर जाहीर केलं आहे. त्यांनी तीन फोटो शेअर करून चाहत्यांची ही आनंदाची बातमी शेअर केली. फोटोंमध्ये रहस्या बेबी बंप फ्लाँट करताना दिसत आहे. किरण आणि रहस्या यांनी २०१९ मध्ये 'राजा वारू राणी गारू' या तेलुगू चित्रपटामधून पदार्पण केलं होतं. तेव्हापासून ते एकमेकांना डेट करत होते. पाच महिन्यांपूर्वी कूर्गमध्ये एका खासगी सोहळ्यात त्यांनी लग्नगाठ बांधली. किरणने 'एसई कल्याणमंडपम', 'सम्माथमे', 'रुल्स रंजन' यासारख्या चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

## शॉर्ट न्यूज

### वाकी शिवारात बिबट्याचा हल्ला


अकोले : तालुक्यातील वाकी येथे बिबट्याच्या प्राणघातक हल्ल्यात काळू देवराम सगभोर हे गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. वाकी येथील आपल्या शेतात राहणारे काळू सगभोर यांच्या घराला लागूनच जनावरांसाठी पडवी तयार करण्यात आली होती. घराच्या कौलावर काहीतरी आवाज झाल्याने त्यांनी दरवाजा उघडून बाहेर पाहण्याचा प्रयत्न केला. याच वेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर हल्ला चढवला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे काळू सगभोर घाबरून गेले.

### मुरूम वाहतूक करणारा डंपर पकडला

नगर : पहाटे चारच्या सुमारास पोलिसांनी वडगाव गुप्ता (ता. नगर) परिसरात छापा टाकून डंपर (एमएच २९ बीई ४५३५) मधून मुरूमाचा अवैध उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्याला पकडले. मुरूमाचे अवैध उत्खनन करून विनापरवाना वाहतूक केल्याच्या आरोपावरून त्याच्याविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय बाळासाहेब मोरे असे गुन्हा दाखल झालेल्या ड्रायवर चे नाव आहे. त्याच्या ताब्यातून अंदाजे चार हजार रुपये किमतीचा चार ब्रास मुरूम व चार लाखांचे डंपर असा लाख चार हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अंमलदार चौधरी तपास करत आहेत.

### अश्वारूढ पुतळ्यासाठी निधी द्या : तांबे

संगमनेर : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा संगमनेर हायटेक बसस्थानकासमोरील मध्यवर्ती जागेत व्हावा यासाठी आमदार सत्यजीत तांबे यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून जिल्हा नियोजन समिती मधून महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी तातडीने एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी आग्रही मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी केली असल्याची माहिती यशोधन या प्रसिद्धी कार्यालयातून देण्यात आली आहे.



### विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

राहुरी : म्हैसगाव परिसरातील शेतकरी प्रमोद दुधाट यांच्या शेतात असलेल्या विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभागाने सुखरूप बाहेर काढले. रात्री भक्ष्याच्या शोधात असलेला बिबट्या विहिरीत पडला असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे. शेतकरी दुधाट यांचे वाटेकरी असलेला व्यक्ती सकाळी मोटर सुरु करण्यासाठी गेला असता त्यांना विहिरीत बिबट्या निदर्शनास आला. सुरुवातीला रस्सीला बाज बांधून विहिरीत खाली सोडली. त्यानंतर दुसऱ्या बाजूला पिंजराही रस्सीच्या सहाय्याने बाजेच्या समांतर बाजूला सोडला आणि बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद केला.

### बैलगाडा शर्यतीतील विजेत्यांवर बक्षिसांची खैरात

नेवासा : देवगड फाटा येथे भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. शर्यतीत प्रथम क्रमांकाचे बक्षीस बुलेट, द्वितीय क्रमांक हिरो होंडा शाईन, तृतीय क्रमांक ईलेक्ट्रिक स्कुटी, चतुर्थ क्रमांक ५ ग्रॅम सोन्याची अंगठी, पाचवा क्रमांक एलईडी टिव्ही, सहावा क्रमांक २१००० रुपये, सातवा क्रमांक १५००० रुपये आठवा क्रमांक ११००० रुपये रोख आणि गट पासला प्रत्येकी दोन कुलर व ट्रॉफी अशी बक्षिसे ठेवण्यात आलेली होती. महाराष्ट्रातील नावाजलेल्या ३०० जोड्यांसह अनेक बैल जोड्या या शर्यतीत सहभागी झालेल्या होत्या.

# रांजणगावच्या महागणपती मंदिरात 'हिरकणी कक्ष'

- तान्ह्या बाळांना घेऊन येणाऱ्या भाविक महिलांना मोठा आधार
- रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या उपक्रमाचे महिलांकडून स्वागत

**शिरुर : सतीश डोंगरे**

रांजणगाव गणपतीच्या महागणपती मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये महिला भाविकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या महिलांसोबत बऱ्याचदा तान्ही बालके असतात. या बालकांना स्तनपान करण्यासाठी देवस्थान ट्रस्टने नव्याने सर्व सोई सुविधांनी युक्त हिरकणी कक्ष सुरु केला आहे.

महागणपती मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या अनेक महिला भगिनीं सोबत लहान लहान बाळं असतात. मात्र मंदिर परीसरात त्यांना निवांतपणे स्तनपान करण्यासाठी सुरक्षित जागा नव्हती त्यामुळे अशा महिलांची गैरसोय होत होती. हिच बाब लक्षात घेऊन मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या महिलांसाठी, सोबतच्या लहान मुलांना सुरक्षित घेऊन बसण्यासाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने सर्व सोयीयुक्त हिरकणी कक्षाची उभारणी केली आहे. ज्यामध्ये मुलांना संगोपन आणि स्तनपान करताना सोयीचे होईल. येथे लहान मुलांना झोपण्यासाठी, कपडे बदलण्यासाठी सुद्धा खास व्यवस्था केली आहे. जवळच पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छतागृह अशा सोयींयुक्त हा कक्ष महिलांसाठी मोठा आधार ठरला आहे.

या हिरकणी कक्षात महिलांना बाळांना सहज घेऊन बसता येईल यासाठी गादी तसेच विजेची सोय, टेबल, खुर्ची अशी सुविधा उपलब्ध आहे. कक्षात उजेड व खेळती हवा रहावी यासाठी खिडकी आणि तिला आकर्षक पडदा लावण्यात आला आहे. हा हिरकणी कक्ष एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट करण्यासाठी त्याची तशी रचना करण्यात आली आहे.

### तीर्थक्षेत्र ठिकाणी हिरकणी कक्ष ही समाधानाची बाब !

*सार्वजनिक, संस्थात्मक, शैक्षणिक अशा संस्थांमध्ये ज्या ठिकाणी महिला मोठ्या प्रमाणात काम करतात. अशा इमारतींमध्ये स्तनदा माता, गरोदर महिला व सहा वर्षाखालील मुले असलेल्या माता यांच्याकरिता हिरकणी कक्ष उभारणे राज्य सरकारकडून बंधनकारक करण्यात आले आहे. त्याबरोबरच आता तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीही हिरकणी कक्ष दिसू लागले आहेत ही खरोखर समाधानाची बाब आहे. आम्ही वैजापूर हून आलो आहोत. याठिकाणी भाविकांना देण्यात येणाऱ्या सोईसुविधा पाहून आनंद वाटला. विशेषत: मंदिर परीसरातील स्वच्छता पाहून मन प्रसन्न झाले रांजणगांव देवस्थानला याबाबत द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.*

*– **अनुपमा घुले**, महिला भाविक, वैजापूर*




### हिरकणी कक्षाचे महिलांकडून स्वागत !


*भाविकांना ट्रस्टच्या वतीने अनेक सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. मंदिरात आपल्या तान्ह्या बाळासह येणाऱ्या महिलांची गैरसोय लक्षात घेऊन सर्व सोईसुविधा सह हिरकणी कक्ष सुरु करण्यात आला आहे. तो अशा महिलांसाठी आधार ठरत आहे. स्पर्श प्रेमाचा स्पर्श वात्सल्याचा, स्तनपान हेच बाळाचे अमृतपान, योग्य आहाराचे सेवन करु आपल्यासोबत बाळाची काळजी घेऊ, स्तनपाना पासून बाळास मिळणारे फायदे तसेच मातांनी कोणता आहार घ्यावा व कधी घ्यावा यासारखे जनजागृती करणारे सचित्र पोस्टरही हिरकणी कक्षात लावण्यात आले आहेत. या उपक्रमाचे महिलांकडून स्वागत करण्यात येत आहे.*

*– **स्वातीताई पाचुंदकर***
*अध्यक्ष रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट*

# नगरचा साईराज जय जय स्वामी समर्थ मालिकेत

**जळगाव : प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथील सावेडीमध्ये सायबर कॅफे चालवणाऱ्या अतुल सरडे यांचा इयत्ता सातवीमध्ये शिकणारा मुलगा साईराज अतुल सरडे हा बालचित्रपट कलाकार कलर्स मराठी वाहिनीवरील जय जय स्वामी समर्थ या मालिकेच्या तब्बल २७ भागांमध्ये अभिनयाच्या माध्यमातून झळकत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे उत्कृष्ट अभिनयाबद्दल त्यास रौप्यपदक प्राप्त झाले आहे. वक्तृत्व, अभिनय, कथाकथन, एकपात्री आदी विविध



कलांमधून झळकणारा साईराज हा बालचित्रपट कलाकार सोनी मराठी वाहिनीमधील गाथा नवनाथांची या धार्मिक मालिकेच्या सुमारे १८ भागांमध्ये देखील विविध पात्रांमधून झळकलेला आहे. नुकत्याच झालेल्या राज्य बालनाट्य स्पर्धेत सप्तरंग थिएटर्सच्या तेरा मेरा सपना या नाटकातील अभिनयासाठी शासनाचे गुणवत्ता प्रमाणपत्र देखील त्यास प्राप्त झाले आहे.


## वाचकांच्या लेखणीतून

# आपले वेद, आपली पुराणे...

आजकाल जमाना सुधारला आहे. आपल्या देशातील बहुतांश लोक साक्षर झाले आहेत. कोण पदवीधर झाले आहे. कुणी डॉक्टरेट केली आहे. शिक्षणाची गोड (?) फळे चाखीत आहेत. वेद अपौरुषेय नाहीत. आपली पुराणे म्हणजे भाकडकथा आहेत. अशी हिंदू संस्कृतीची निंदाही करतात.

हिंदुस्थान इंग्रजांचा गुलाम असताना त्यांनी आम्ही हिंदुस्थानचे शासक आहोत. आमचा ख्रिस्ती धर्म जगात सर्वश्रेष्ठ आहे. इथले लोक, त्यांचा धर्म, त्यांची संस्कृती मागासलेली आहे. त्यांचे वेद वृथा वटवट आहे. पुराणे खोटी आहेत. अशी शिकवण इथल्या नवशिक्षितांच्या मनात त्यांनी भरवून ठेवली. या नवशिक्षितांनी ती नुसती प्रमाणच मानली नाही; तर तिचा हिंदू समाजात ठासून प्रचारही केला. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशी परिस्थिती येथे निर्माण झाली. नाही तरी मेकॉले म्हणालाच होता, हिंदुस्तान स्वतंत्र झाल्यावर तिथले लोक रक्ताने हिंदू असतील; पण मनाने ते इंग्रज असतील! आपला देश स्वतंत्र झाल्यावर मेकॉलेची भविष्यवाणी खरी निघाली! इथली नवशिक्षित पिढी इंग्रजी पेहराव करू लागली. इंग्रजी बोलू लागली. इंग्रजीत विचार करू लागली. आमच्या पवित्र वेद आणि पुराणांना तुच्छ लेखू लागली. त्यांची निंदानालस्ती करू लागली. हे बरे झाले नाही.

हल्ली आपल्या देशात प्लॅस्टिकवर बंदी आहे. दारूबंदी आहे. तरीही हे राजरोसपणे चालूच आहे. चांगल्या शिकल्या सवरलेल्यांना सांगूनही काहीच फायदा होत नाही. नाटके. पथनाट्ये, चित्रपट, लेख हे सगळे उपाय होऊनही सुधारणेत काहीच फरक नाही. मग पुराणकाळी हिंदुस्थानात बहुतांश लोक निरक्षर आणि अनाडी असताना त्यांना उच्च विचार समजावून सांगणे हे एक महाकर्मच होते. हिंदू संस्कृती प्रतीकांतून प्रकट होते. असे म्हणतात. म्हणून आमच्या प्राचीन ऋषींना किंवा समाजधुरिणांना प्रतीकात्मक कथांचा आसरा घेऊन उच्च विचार सामान्य लोकांच्या मनात उतरवावे लागले. पुराणकथा सांगताना कंटाळवाणे वाटू नये म्हणून काही वेळेला पुराणकारांना आडकथांचाही वापर करावा लागला (त्यांतही काही ना काही विचार पेरलेले असत. हेही तितकेच खरे). त्या कथांना




आज आपण भाकडकथा किंवा पुराणातली वांगी म्हणणे सर्वथैव चुकीचे आहे. पुरा न भवति इति पुराणम् किंवा जुने वाटले तरी नित्य नवेच असते ते पुराण. अशी पुराणाची संस्कृत भाषेत व्याख्याच आहे. ब्रह्म पुराण,विष्णु पुराण, लिंगपुराण, भागवत पुराण इत्यादी अष्टादश पुराणे आपली पैतृक संपत्ती आहे. ठेवा आहे.

तीच गोष्ट वेदांची. वेद म्हणजे बोलणे किंवा ज्ञान. वेदकाली लेखनकला होती की नाही याबद्दल दुमत आहे. हा भाग सोडला तरी त्या काळी गुरु शिष्याला मौखिक किंवा पाठांतराच्या रूपाने वेद शिकवीत असत. वद्+वदति (बोलणे. सांगणे) या क्रियापदापासूनच वेद शब्द बनला. म्हणून ते वेदवाङ्मय आज आपल्यापर्यंत पोहोचू शकले. लेखनकलेनंतर मुद्रणकलाही आली. वेदांना लिखित रूप मिळाले. वेद ग्रंथनिविष्ट झाले. सारांश. मौखिक पध्दतीने ते वेद आपल्या पिढीपर्यंत आले. त्यावर कुणा एकाची मालकी किंवा स्वामित्व नाही. म्हणून आपण वेदांना अपौरुषेय वाङ्मय म्हणतो. इतकेच. त्यात टीका करावे असे काय आहे?

वेद अपौरुषेय आहेत. पुराणे भाकडकथा नाहीत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद ही आपल्या संस्कृतीची उगमस्थाने आहेत. आपल्या संस्कृतीचे बीजरूप विचार त्यांमध्ये दडलेले आहेत. आपली उपनिषदे, पुराणे तसेच कीर्तने आणि प्रवचने ही वैदिक तत्वज्ञानाचा किंवा वैदिक दर्शनाचा विस्तार आहे. भाष्य आहे. आपल्या चिंतनाचा विषय आहे. कर्म, ज्ञान आणि भक्तीचा आदर्श आहे. म्हणून वेदपुराणादी वाङ्मयाची निंदानालस्ती करणे ही आपलीच निंदानालस्ती करण्यासारखे आहे. हे आपल्याला आवडेल?

**नाना ढवळे,**
८२८९९१३२२३,
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# पालकमंत्री पदासाठी हावरटपणा सुरू

## जिल्ह्याची मागणी करण्यामागे रहस्य दडले ; आ.एकनाथ खडसेंची टीका

**जळगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात महायुतीने प्रचंड बहुमताने सत्ता स्थापन केली. मात्र, त्यानंतरपासून महायुतीमध्ये नाराजीचे सूर अधून मधून उमटताना दिसतच आहेत. सध्या पालकमंत्री पदावरून महायुतीमध्ये मतभेद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे रायगड व नाशिक येथील पालकमंत्र्यांच्या नावांना स्थगिती देण्यात आली आहे. यावरून आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार एकनाथ खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांना टोला लगावला आहे.

आमदार एकनाथ खडसे यांनी नाशिकच्या पालकमंत्री पदावर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले, पालकमंत्रिपदावरून सध्या या सरकारमध्ये भानगडी सुरू आहेत. मला हा जिल्हा पाहिजे, तो जिल्हा पाहिजे असे सुरू आहे. हा अजब प्रकार सुरू आहे. नाशिकच्या पालकमंत्री पदावरून सध्या या सरकारमध्ये भानगडी सुरू आहेत. पालकमंत्री पदासाठी सरकारमधील काही मंत्र्यांचे वादविवाद असल्याचे सांगितले जात आहे. आपल्याला याच जिल्ह्याचा पालकमंत्री व्हायचे आहे, असा हावरटपणा आणि आचरटपणा काही मंत्री करत आहेत. मात्र, हाच जिल्हा पाहिजे अशी मागणी करण्यामागे रहस्य दडले, असा मोठा दावा एकनाथ खडसे यांनी केला.

पुढे बोलताना एकनाथ खडसे यांनी कार्यकर्त्यांना आव्हान केले आहे, खडसे म्हणाले, जिंकलो किंवा हरलो विधानसभेत पराभव का झाला याचे चिंतन करायला



पाहिजे. केंद्र सरकारकडून कापूस खरेदी बंद झाली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. लाडकी बहीण सुरू केली आणि आता चौकशी सुरू केली. चौकशीनंतर गुन्हे दाखल होऊ शकतात. विधानसभेत निवडणुकीत आपल्याला अपयश येणे याची अनेक कारण असू शकतात. लाडकी बहीण, पैशाचा वापर गुंडगिरी, काही लोकांना ईव्हीएम मशीनवरही संशय आहे. या सर्व बाबीचे चिंतन करा आणि नवी सुरुवात करा.

पुढे एकनाथ खडसे म्हणाले, अपयश आले तरी मी मात्र थांबणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आहेत. जास्तीत जास्त मतांनी निवडून आणा. आपल्या अपयशापेक्षा हे जाऊ द्या. सरकारलाही असे वाटते की आपण एवढ्या जास्त फरकाने कसे आलो, तेही यातून सावरलेले नाही. काही जणांना असे वाटत आहे की मी अजित दादासोबत जातोय, तर काहींना वाटत आहे की भाजपमध्ये जातो. मात्र या सर्व चर्चा आहेत, असे स्पष्टीकरण एकनाथ खडसे यांनी केले आहे.

पान १ वरून...

### सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ द्या !

शासनाच्या वतीने मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ भेटलीच पाहिजे. यासंदर्भात संबंधित मंत्रीमहोदयांशी आपण पत्रव्यवहार करणार आहोत. आजही सोयाबीन खरेदी केंद्रांवर शेतकरी विविध वाहनांमधून सोयाबिन घेउन आल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. आठ दिवसांची मुदत वाढ देऊन काही होत नाही. किमान एक महिन्याची मुदत वाढ द्यायला हवी. शेतकऱ्यांना द्यायचे असेल तर मोकळया मनाने दिले पाहिजे. आठ दिवस मुदतवाढ दिल्यानंतर त्याची माहीती होण्यासाठी दोन दिवस जातात. मग चार पाच दिवसांत काय होणार आहे ? असा सवाल खा. लंके यांनी केला.

### स्व. वसंतराव झावरे स्मृतीगंध पुरस्कार जाहीर

समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे किर्तन आयोजीत करण्यात आले आहे. स्व. झावरे यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य निष्कलंक व्यक्तिमत्व म्हणून व्यतित केले. पारनेरकरांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे वसंतदादा हे सर्व लोकांचे प्रेरणास्थान आहेत.

काळू मध्यम प्रकल्प, भांडगांव मध्यम प्रकल्प, शिवडोह मध्यम प्रकल्प, पिंपळगांव जोगे कालवा, मांडओहळ प्रकल्प कालवा, पारनेर येथे ग्रामीण रूग्णालय, वीजेची समस्या दुर करण्यासाठी चार सब स्टेशनची उभारणी ही त्यांच्या आमदार म्हणून काम करतानाची उल्लेखनीय कामे आहेत. आदिवासी बांधवांसाठी त्यांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरले.

### धनंजय मुंडे कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात दोषी

न्यायालयाने दिले आहेत. ही पोटगीची रक्कम खटला सुरू झाला तेव्हापासून आतापर्यंत धनंजय मुंडे यांना द्यावी लागणार आहे.

**मी करुणा शर्मा नाही तर करुणा धनंजय मुंडे**

मला करुणा शर्मा नाही तर करुणा धनंजय मुंडे म्हणा, अशी प्रतिक्रिया करुणा यांनी वृत्त वाहिनीशी बोलताना दिली. न्यायालयाने मीच धनंजय मुंडे यांची पहिली पत्नी असल्याचे मान्य केले आहे. हे नाव मिळवण्यासाठी मी खूप मोठी किंमत चुकवली असल्याचे देखील करुणा मुंडे यांनी म्हटले आहे. 'न्याय जिंकला' हीच माझी पहिली प्रतिक्रिया असल्याचे देखील करुणा मुंडे यांनी म्हटले आहे.

**एक स्त्री म्हणून त्यांचे अभिनंदन – अंजली दमानिया**

या संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील एका पोस्टच्या माध्यमातून ही माहिती दिली आहे. यामध्ये त्या म्हणाल्या की, 'करुणा मुंडे या फॅमिली कोर्टात ४ फेब्रुवारी रोजी केस जिंकल्या त्याबद्दल एक स्त्री म्हणून त्यांचे अभिनंदन. मी वैयक्तिक विषयावर बोलत नाही आणि ही वैयक्तिक टीका नाही ह्याची नोंद घ्यावी. करुणा, ह्या धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी आहेत, त्यांना मारहाण झाली आहे आणि देखभाल खर्च देण्यात यावा आणि कुठल्याही प्रकारची दुखापत करण्यात येऊ नये असे निर्देश आणि १ लाख २५ हजार रुपयाचा मासिक खर्च देण्यात यावा असे निर्देश कोर्टाने दिले आहेत.'

### 'लाडक्या बहिणी'च्या प्रसिद्धीसाठी ३ कोटी!

दिली होती. त्यानुसार आता योजनेचा सोशल आणि डिजिटल माध्यमात प्रचार, प्रसार करण्यासाठी प्रत्येकी दीड कोटी रुपये खर्च केला जाईल, असे यात नमूद केले आहे.

**पुन्हा कोट्यवधींचा खर्च कशासाठी? :** पुन्हा सत्तेत आलेल्या महायुती सरकारमधील अनेक मंत्री खासगीमध्ये 'लाडकी बहीण' योजनेवर होणारा खर्च डोईजड झाल्याचे बोलताना दिसत होते. त्यातच महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात या रक्कमेत महिना ७०० रुपयांची वाढ करून दोन हजार १०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे महिला आणि बालविकास विभागाने 'लाडक्या बहिणीं'च्या अर्जांची छाननी सुरू करून अपात्र महिलांना योजनेतून बाहेर काढण्याचे ठरवले आहे. अशावेळी पुन्हा योजनेच्या प्रचार आणि प्रसिद्धीवर पुन्हा कोट्यवधी रुपयांचा खर्च कशासाठी, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

### कर्ड्याच्या फौजदाराने बांधली वडझिरे तर्फेची वेस !

ज्यात अनेक तर्फ असत.

शिलालेखात उल्लेख असलेला शेख अब्दुल रहीमान हा त्यावेळी कर्डे परगण्याचा फौजदार होता. फौजदार हे पद लष्करी, महसुली तसेच न्यायिक होते. त्याच्या अमलाखालील सिराजुददीन मुहंमद नावाच्या जहागीरदाराने वडझिरे गावचे प्रवेशदवार म्हणजे वेस बांधली. त्याची स्मृती म्हणून या वेशीवर शिलालेख कोरण्यात आला. वडझिरे हा घाटमार्गावरील चौत्रा म्हणजे नाका असल्याचा उल्लेख तत्कालीन कागदपत्रांमध्ये पहावयास मिळतो.

याच समकालीन जेधे शकावलीत शके १५९१ या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांनी कोंढाणा किल्ला घेतल्याचे, राज गडावर राजाराम महाराज यांचा जन्म झाल्याच्या नोंदी आढळतात. याच वष छत्रपती शिवाजी महाराज आणि मोघल यांचा तह तुटल्याच्या नोंदी आढळून येतात.

**शिलालेख स्थान व स्वरूप :** वेशीच्या डाव्या बाजूला कोरलेला हा शिलालेख पाच ओळींचा व खोदीव स्वरूपाचा आहे. पूव वेशीला रंग दिल्याने शिलालेख खराब झाला असला तरी त्याचे वाचन मात्र करता येते.

**शिलालेख मिती :** पिले जंत्री नुसार हा शिलालेख शके १५९१ म्हणजेच इसवी सन १६६९-१६७०या दरम्यान कोरलेला आहे. यात सन १०७९ असाही उल्लेख असून तो हिजरी सनाचा आहे. म्हणजेच हा शिलालेख तब्बल ३५५-३५६ वर्षे जुना आहे. शिलालेख देवनागरी आणि मोडी असा संमिश्र लिपीत आहे. अ ळ आणि र ही आक्षरे मोडी वळणाची आहेत.

**मराठी भाषेवर फारसी भाषेचा प्रभाव :** शिलालेखामध्ये शेख अब्दुल रहीमान आणि सीराजुददीन मुहंमद अशी दोन व्यक्ती नामे आहेत. त्यांच्याबद्दल अधिक माहीती उपलब्ध होत नाही. यापूर्वही मुघल काळातील काही शिलालेख पारनेरात सापडले आहेत, मात्र ते या शिलालेखानंतर १० वर्षांचे आहेत. शिलालेख देवनागरी लिपीत असला तरी जागीर, अमल, फौजदार, दरवाजा हे फारसी शब्द यात आले आहेत. पारनेर येथील शिलालेखातही फौजदार शब्द आलेला आहे. तत्कालीन मराठी भाषेवर फारसी भाषेचा प्रभाव दिसून येतो. **सतिश भि.सोनवणे,** इतिहास अभ्यासक

# सुप्याच्या बाजारात महिलेचे दागिने ओरबडले !

## मोटारसायकलवरून ठोकली धूम ; चोरटे सीसीटीव्हीत कैद

**सुपा : प्रतिनिधी**

सुपा शहरात बुधवारी दुपारी बाजार करण्यासाठी येत आसलेल्या महिलेच्या गळ्यातील दागिने दोघा मोटार सायकलस्वाराने ओरबडून धूम ठोकली.दरम्यान हे चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत.चोरट्यांना पकडून देणाऱ्यास सरपंच मनीषा रोकडे यांच्याकडून ११ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बुधवारी सुप्याचा आठवडे बाजार असल्याने सुपा नवीन वसाहतीतील काही महिला दुपारच्या वेळी बाजार करण्यासाठी येत असताना साई मंगल कार्यालयाच्या मागील बाजु जवळ काळ्या मोटारसायकलवर दोघे युवक तोंडे बांधुन आले व पाठीमागुन येऊन महिलेच्या गळ्यातील दागिने ओरबाडून नेले. यावर महिलेने आरडाओरडा केला पण तोपर्यंत चोर टुव्हीलरवर फरार झाले होते.



घटनेची माहिती मिळताच सुपा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे पोलीस फौजफाटा घेऊन तात्काळ घटनास्थळी आले व माहिती घेतली त्यानंतर त्यांनी सुपा आठवडे बाजारातूनही फेरफटका मारला. सुपा ग्रामपंचायतने बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरटे दिसत असुन सुपा गावच्या सरपंच मनीषा योगेश रोकडे यांनी चोर पकडून देणारास अकरा हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले आहे.

बुधवारी भर दिवसा व गर्दीचा वार असताना चोरांनी दागिने ओरबडले असल्याने महिला वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले. चोरटे महीला एकट्या पाहून डाव साधतात तर काही भुरटे चोर बाजारातील गर्दीचा फायदा उठवतात तेव्हा नागरिकांनी सावध रहावे बाजारात येताना मौल्यवान वस्तू बरोबर आणू नये असे आवाहन पोलिस निरिक्षक दिवटे यांनी केले आहे.

याबाबत काही नागरिकांचे म्हणणे आहे की, आठवडे बाजारसाठी बाजाळतळावरील शेड रिकामे असताना अनेक विक्रेते रोडच्या कडेला ग्रामपंचायत सचिवालयाच्या दारात बसतात त्यामुळे पारनेर रोड व ग्रामपंचायत दारात मोठी गर्दी होते याच गर्दीचा फायदा घेऊन येथुन अनेकांच फोन चोरी झाले आहेत.

### सरपंच मनिषा रोकडेंकडून ११ हजारांचे बक्षीस

*सुपा शहरात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे आठवडे बाजारासह दररोज बाजारपेठ गजबजलेली असते. आठवडे बाजारातून मोबाईल चोरीच्या घटना वारंवार घडत आहेत. आता चक्क धूम स्टाईलने येऊन महिलांच्या गळ्यातील सोने ओरबडण्यापर्यंत चोरांची मजल गेली. याला कुठेतरी आळा बसावा यासाठी सरपंच मनिषा योगेश रोकडे यांनी चोरांना पकडून दिल्यास ११ हजार रुपये दिले जातील असे बक्षीस जाहीर केले. सुपा बाजारालगत महिलांच्या गळ्यातील सोने ओरबताना चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले.*

# बाबुर्डी गावासाठी ३९ घरकुलांना मंजुरी

## सरपंच प्रकाश गुंड यांची माहिती

**सुपा : प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील बाबुर्डी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ३९ घरकुलांना मंजुरी मिळाली असल्याची माहिती सरपंच प्रकाश गुंड यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेनुसार प्रधानमंत्री घरकुल आवास योजना ही गरिबांसाठी असणारी कल्याणकारी योजना केंद्र व राज्य सरकार राबवित आहे. सन २०१६ / १७ पासून ग्रामपंचायत च्या माध्यमातून गरजू लाभार्थी यांच्या प्रतीक्षा यादी 'ड ' या यापूर्वीच तयार करण्यात आलेल्या आहेत.

खासदार डॉ. नीलेश लंके यांच्या पाठपूराव्यातून पारनेर तालुक्यात विक्रमी चार हजार घरकुलांना मंजुरी मिळाली असून त्याचाच भाग म्हणून बाबुर्डी येथील प्रतीक्षेत असणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. यासाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता, जागा आदीबाबत



ग्रामपंचायतच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात आलेला आहे. बाबुर्डी ग्रामपंचायतीच्या वतीने गेल्या चार वर्षात मोठया प्रमाणात रमाई आवास, शबरी आवास या घरकुल योजना राबवून सर्व घटकातील नागरिकांना लाभ देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आता प्रधानमंत्री आवास योजनेतून खुल्या वर्गातील गरिबांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यात यशस्वी झाल्याचे समाधान असून सर्व लाभार्थी यांनी तात्काळ ग्रामपंचायत च्या सूचनेनुसार काम सुरु करावे असे आवाहन सरपंच प्रकाश गुंड, उपसरपंच स्वाती जगताप यांनी केले आहे.




भूगोल दिनानिमित्त अळकुटी महाविद्यालयात डॉ. नीलेश काळे यांचे व्याख्यान झाले.

# मदर ऑफ सायन्स म्हणून भूगोलाची ओळख !

## डॉ. नीलेश काळे यांचे प्रतिपादन ; अळकुटी महाविद्यालयात भूगोल दिन

**अळकुटी : प्रतिनिधी**

कन्टेटिव्ह रिव्हॅल्युशनमुळे भूगोल विषयास शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला असून भूगोलास मदर ऑफ सायन्स म्हणूनही ओळखले जात असल्याचे प्रतिपादन भूगोल विभागप्रमुख डॉ. नीलेश काळे यांनी केले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विज्ञान विभागाच्या वतीने भूगोल दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. कुंदा कवडे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

भूगोल तज्ञ सी.डी. देशमुख यांचा जन्मदिन भूगोल दिन म्हणून पाळला जात असल्याचे सांगत यावेळी बोलताना डॉ. काळे म्हणाले, भूगोलाचा सबंध अंतरविद्याशाखीय स्वरूपाचा आहे. प्लॅस्टिकचे नॅनो पाटकल मानवी जीवनावर परिणाम करतात. आजच्या उपयोजित भूगोलात त्याचा अभ्यास केला जातो व उपाययोजना सुचविल्या जातात असे डॉ. काळे म्हणाले.

यावेळी प्राचार्य प्रशांत लोखंडे, उपप्राचार्य प्रा. अमोल नालकर, प्रा. अर्जुन चाटे, प्रा. संजय जाधव,प्रा. विशाल रोकडे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. पांडूरंग उघडे, प्रा. सचिन बलसाने, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, प्रा. शांता थोरात, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. अनुराधा गाढवे, सुनिता भालेराव, प्रा. पुजा वैरागर, प्रा. सुप्रिया पारखे आदी उपस्थित होते. प्रा. सुनीता जाधव यांनी प्रास्ताविक, प्रा. विनायक सोनवणे यांनी सुत्रसंचलन तर प्रा. पोपट सुंबरे यांनी आभार मानले.

**नोकरीच्या संधी निर्माण करा**

जीआयएस, रिमोट सेसिंग व जीपीएस कार्सेस करून विद्यार्थ्यांनी नोकरीच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत. संशोधनशास्त्र आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांना इस्त्रो सारख्या नामांकित संस्थांमध्ये संधी मिळते. पर्यटन व व्यवस्थापन क्षेत्रातही विद्यार्थ्यांना अनेक संधी आहेत.

### भूगोल उत्साहवर्धक विषय !

*भूगोल हा विषय उत्साहवर्धक आहे. जनसामान्यांचा भूगोलाशी दैनंदिन सबंध येतो व तो सर्वांशी जोडलेला एक अविभाज्य भाग आहे. भूगोलाच्या सर्वच शाखा मानवी ज्ञानसाठी समृध्द करतात.*

*- **डॉ. कुंदा कवडे,** प्राचार्या*

# कबड्डी स्पर्धेत आकाशदादा कोंडके संघ प्रथम

## ९६६६ संघ द्वितीय तर स्ट्रायकर्स संघाला तृतीय क्रमांक

**निघोज : प्रतिनिधी**

निघोजमध्ये स्ट्रायकर्स कबड्डी संघाने कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये प्रथम क्रमांकाचे आठ हजार रुपये बक्षीस व चषक चाकण येथील आकाश दादा कोंडके संघाला मिळाले असून द्वितीय क्रमांक पाच हजार रुपये बक्षीस व चषक ९६६६ कबड्डी संघ, तृतीय क्रमांक स्ट्रायकर्स ग्रुप कबड्डी संघ, चतुर्थ क्रमांक शिवशंभू वॉरियर्स या संघांना बक्षिसे देण्यात आली.

उत्कृष्ट चढाई,उत्कृष्ट पकड. अशा खेळाडूंनाही बक्षिसे ठेवण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कबड्डीपटू विठ्ठलशेठ कवाद हे होते. त्याचप्रमाणे कबड्डीचे खेळाडू अशोकशेठ ढवळे, शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, मळगंगा ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास



लामखडे,रमेश भुकन, शांताराम लामखडे, अभिषेक वरखडे. तसेच स्पर्धेचे आयोजक -ओंकार रसाळ ,पारस इधाटे,ओम लंके, ओम रसाळ,कृष्णा लामखडे, श्रेयस रसाळ, शिवा प्रजापति, स्वराज कवाद ,आरमान शेख यांनी केले आणि या स्पर्धेचे संयोजक- अमन जगदाळे, वेदांत वरखडे ,सुमित काळे ,स्वराज कवाद ,कृष्णा राऊत,आयुष लामखडे मयूर लामखडे ,आर्यन घनवट, ओम निचित ,राम पवार, मयूर लंबे, सर्वम आल्हाट, मारुती डहाळे ,समर्थ होणे या खेळाडूंनी स्पर्धा पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

विठ्ठलशेठ कवाद यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आम्हीही पूर्वी वीस पंचवीस वर्षांपूर्वी कबड्डी स्पर्धेचे निघोज मध्ये आयोजन करत असत. आमचा साई श्रद्धा स्पोर्ट क्लब निघोज मध्ये होता. त्यामधून अनेक खेळाडू घडले. त्यावेळेस आम्ही स्पर्धा भरवताना महाराष्ट्रातील अनेक संघ निघोजमध्ये खेळायला यायचे. पुढच्या वर्षी स्पर्धेचे नियोजन चांगले करा आपण आमदार काशिनाथ दाते यांच्या नावाने आमदार चषकाचे नियोजन करणार असल्याची माहिती कवाद यांनी दिली आहे.

कबड्डीचे खेळाडू अशोक ढवळे यांनी तसेच शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, यांनी मनोगत व्यक्त केले. आणि सर्वांचे आभार अभिषेक वरखडे यांनी मानले.

# तुरीची चोरी करणारे तिघे ताब्यात

**रांजणगाव मशीद : प्रतिनिधी**

येथे शेतातील तुरीची चोरी करणारे तिघे श्रीगोंदा येथून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. त्यांच्याकडून तब्बल २ लाख ९० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पुढील तापासासाठी त्यांना सुपा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.अनिल हरीभाऊ गोलवड, (रा.कामठी, ता.श्रीगोंदा), संतोष सुधाकर चौरे, (रा.मांडवगण), जालिंदर रावसाहेब गोलवड, (रा.कामठी) असे संशयित आरोपींचे नाव आहे. त्यांच्याकडे चौकशी केली असता संजय भाऊसाहेब गोलवड, संतोष भाऊसाहेब गोलवड, राहुल बाळू पवार, लहू भागाचंद पवार(सर्व पसार) यांनी ही चोरी केल्याचे तपासात समोर आले. चोरलेली २० क्विंटल तूर व्यापारी अशोक सुपेकर (मिरजगाव, ता.कर्जत) यांना विकली. संबंधित आरोपींकडून दोन लाख ९० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखेचे अंमलदार अतुल लोटके, गणेश लोंढे, संतोष खैरे, सोमनाथ झांबरे, विशाल तनपुरे, मेघराज कोल्हे व महादेव भांड यांच्या पथकाने केली.

# पारनेरचे सुपुत्र पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष!

## चिंचोलीचे ॲड. हेमंत झंजाड विक्रमी मतांनी विजयी

## ॲड. झंजाड यांच्यावर पारनेर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव

**पारनेर : प्रतिनिधी**

पुणे बार असोसिएशनच्या वार्षिक निवडणुकीत अध्यक्षपदासाठीच्या लढतीत पारनेर तालुक्यातील चिंचोली गावचे सुपुत्र ॲड. हेमंत झंजाड यांनी विक्रमी मतांनी विजय मिळविला. झंजाड यांना ३३२९ मते मिळाली. त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार ॲड. प्रवीण नलावडे यांचा १६१५ मतांनी पराभव केला.

शिवाजीनगर न्यायालयातील अशोका हॉल येथे नुकतीच मतदान व मतमोजणी प्रक्रिया पार पडली. पहाटे साडेचारपर्यंत मतमोजणी चालली. त्यानंतर निकाल



जाहीर करण्यात आला. उपाध्यक्षपदी ड. समीर भुंडे आणि ड. सुरेखा भोसले विजयी झाल्या. सचिवपदासाठी ड. पृथ्वीराज थोरात व ड. भाग्यश्री गुजर-मुळे यांचा विजय झाला. खजिनदारपदासाठी ड. इंद्रजित भोइटे विजयी झाले.

'ऑडिटर' पदी ड. केदार शितोळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. कार्यकारिणी सदस्यांचीही यापूर्वीच सर्वानुमते निवड झाली आहे. त्यात गणेश माने, स्वप्नील जोशी, पूनम मावाणी, माधवी पवार, भारती नेवाळे, प्रशांत पवार, श्रीकांत चोंधे, प्रसाद निगडे, आकाश गलांडे आणि राज खैरे यांचा समावेश आहे

निवडणुकीसाठी प्रमुख निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. गिरीश शेडगे, ॲड. विजयराज दरेकर यांनी कामकाज पाहिले. अतिरिक्त निवडणूक अधिकारी म्हणून ड. अमोल जाधव व ॲड. अण्णासाहेब पवार यांनी, तर ॲड. सुप्रिया कोठारी, ड. सचिन झालटे पाटील व ॲड. अतुल आर. पाटील यांसह अकरा जणांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.ॲड. झंजाड यांच्यावर पारनेर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दोन बिबट्यांचा शेळीवर हल्ला

## गाडीलगांवमध्ये बिबट्याची दहशत कायम

**गाडीलगांव : प्रतिनिधी**

तालुक्यातील गाडीलगांव येथे शेळयांच्या गोठयामध्ये दोन बिबट्यांनी प्रवेश करून एका शेळीवर हल्ला केल्याने शेळी गंभीर जखमी झाली. इतर शेळ्यांच्या आवाजामुळे शेतकरी घराबाहेर आल्याने दोन्ही बिबट्यांनी गोळयाबाहेर पळ काढला.

मिळालेल्या माहितीनुसार गाडीलगांव येथल शेतकरी गोरख शिंदे व त्यांचे कुटूंबिय बुधवारी रात्री जेवण करून झोपल्यानंतर रात्री ११ वाजण्याच्या सुमारास गोठयाची जाळी तोडून बिबट्यांनी आत प्रवेश केला. एका शेळीस लक्ष्य केल्यानंतर बिबटयांनी तिला चावा घेण्यास सुरूवात केली. बिबट्यांच्या तावडीत सापडलेल्या शेळीसह इतर शेळयांच्या आवाजाने गोरख शिंदे हे घराबाहेर आले. बिबटयांना पाहून ते देखील घाबरले. त्यांनी आरडाओरडा सुरू केल्यानंतर मात्र दोन्ही बिबट्यांनी तिथून पळ काढला. गुरूवारी सकाळी वन विभागाशी संपर्क करून घटनेची माहिती देण्यात आल्यानंतर पंचनाम्यासाठी पथक पाठविण्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले. दरम्यान सकाळी पशुवैद्यकिय अधिकारी गुंड यांनी घटनास्थळी येऊन जखमी शेळीवर उपचार केले.

गाडीलगांव व परिसरात बिबट्यांच्या संचार असून ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे. वन विभागाने पिंजरे लाऊन बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात येउनही निवेदनाकडे दुर्लक्ष केले जात असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. रात्री १२ ते सकाळी ८ अशी शेती पंपांसाठी वीज पुरवठा सुरू असतो. बिबट्यांच्या दहशतीमुळे रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देण्यासाठी शेतकरी घराबाहेर पडत नाहीत. बिबटयाच्या दहशतीमुळे शेती करायची तरी कशी हा प्रश्न निर्माण झाला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सुरेश गाडीलकर यांनी सांगितले.

### गावराण कोंबडया फस्त !

*दोन दिवसांपूव गाडीलगांमधील ज्ञानदेव भागाजी चत्तर यांच्या वस्तीवरील कोंबडयांच्या खुराडयास बिबटयांनी लक्ष्य करून त्यातील १५ गावरान कोंबडया फस्त केल्या.*

### रेनवडीत युवकावर हल्ला

*तालुक्यातील रेनवडी येथे दुचाकीवरून निघालेल्या दोघांपैकी एकावर बिबटयाने हल्ला केला. पंजा मारल्याने एक त्या तरूणाच्या पायाला जखम झाली असून वाहनावरून पडल्याने त्या तरूणाच्या डोक्यालाही मार लागला असून उपचारासाठी त्याला रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.*



# मोठी स्वप्ने पाहून साकारण्यासाठी प्रयत्नशील राहा !

## मोठी स्वप्ने पाहून साकारण्यासाठी प्रयत्नशील राहा ! ; सीए राजेंद्र डांगी यांचा सल्ला

**पारनेर : प्रतिनिधी**

मोठी स्वप्ने पाहून ती साकारण्यासाठी प्रयत्नशील राहा. तुमच्या अभ्यासात सातत्य ठेउन ध्येय गाठण्याची मनाशी खुणगाठ बांधा असा सल्ला चार्टर्ड अकाउंटंट राजेंद्र डांगी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ण्ड सायन्स कॉलेजमध्ये आयक्युएसी, वाणिज्य व बी बी ए-सीए विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य विभागातील आत्मनिर्भर स्वयंरोजगार संधी या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेप्रसंगी सीए राजेंद्र डांगी यांनी विद्यार्थ्यांशी चार्टर्ड अकाउंटन्सी, कंपनी सेक्रेटरीशिप, आर्थिक विश्लेषण या वाणिज्य विभागातील स्वयंरोजगार संधी उपलब्ध असल्यासबंधीच्या विषयावर संवाद साधला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर हे कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना डांगी म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. ती नेमकेपणाने ओळखून योग्य दिशेने वाटचाल करण्याची आवष्यकता आहे. आजच्या स्पर्धात्मक जगात नियोजन, कठोर आणि जिद्द यामुळे कोणतीही अशक्य वाटणारी गोष्ट साध्य होउ शकते हे यशाचे गमक त्यांनी विद्यार्थ्यांपुढे उलगडले.

कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा. रोहिणी म्हसे तर प्रास्ताविक प्रा. शिवाजी पठारे यांनी केले. बी बी ए-सीए विभागप्रमुख प्रा. रणजीत शिंदे यांनी आभार मानले. यावेळी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. युवराज वाघेरे, बी बी ए विभागप्रमुख प्रा. राजेश पिंपरकर, डॉ. भूषण भालेराव, प्रा. तुषार गालबोटे, प्रा. सविता पिंगट, प्रा. प्रियंका आतकर, प्रा. प्रिया जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



पारनेर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत सीए राजेंद्र डांगी यांनी मार्गदर्शन केले.

*विद्यार्थ्यांकडे उत्तम करिअर करण्यासाठी अनेक पर्याय आहेत. कोर्स निवडणे कधीही सोईस्कर पर्याय असू शकत नाही तर विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीचा, प्रेरणादायी कोर्स निवडून आत्मनिर्भर यशस्वी वाटचाल करावी.*

***डॉ. रंगनाथ आहेर प्राचार्य***

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ • Mob : 9421478283 • Email : deviabuj@gmail.com